# राज्य शासनाचे सर्वोत्तम काम बँकांसाठी आश्वासक - फडणवीस

## पायाभूत सुविधा विकासासाठी बँकांकडून मिळणाऱ्या सहकार्याबाबत समाधान

**मुंबई :** प्रगतिशील महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी बँकांचे सहकार्य नेहमीच मिळत असते. समृद्धी महामार्गाच्या यशस्वी कामामुळे अनेक बँका राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना कर्ज देण्यासाठी पुढे येत आहेत. महाराष्ट्र शासन बँकांसाठी आश्वासक ठरत असून, बँकांकडून शासनाला यापुढेही असेच सहकार्य मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची आढावा बैठक गुरुवारी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात झाली. त्या वेळी त्यांनी हा विश्वास व्यक्त केला. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत सर्व बँकांच्या सहकार्याने राज्यात २५ कोटी ८७५ कोटींचे अर्थसहाय्य प्राप्त झाले. राज्यातील पायाभूत सुविधांसाठी या वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्यात १ लाख कोटी रुपयांची कामे पूर्ण होतील. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करूनच राज्य विविध बँकांकडून नियमित कर्ज घेऊन त्याची परतफेड करत असते. राज्यातील रस्ते दर्जेदार होण्यासाठी राज्य शासन कोणाच्याही शिफारशीशिवाय प्रत्यक्ष रस्त्यांची गरज कोणत्या भागात आहे, हे लक्षात घेऊन रस्ते विकासासाठी नियोजन करत असून, उत्तम दर्जाचे रस्ते देण्यासाठी प्रयत्नशील आहे. सर्व बँकांनी राज्यातील पायाभूत सुविधांसाठी राज्य शासन करत असलेले नियोजन व अंमलबजावणी याची माहिती जरूर घ्यावी. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित म्हणाले, शंभर दिवसांच्या कार्यक्रमामध्ये पुणे ते शिरूर उड्डाणपूल, तळेगाव-चाकण-शिक्रापूर हायवे, हडपसर-यवत हायवे या कामांना आवश्यक असलेली मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन नॅशनल हायवेची कामे गतीने पूर्ण करण्यात येतील.

### राज्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणावर भर – शिवेंद्रसिंहराजे भोसले

**भोसले या वेळी म्हणाले, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत विविध रस्त्यांची कामे सुरू आहेत. सुधारित हॅम पहिल्या टप्प्यातील कामे प्रगतीपथावर आहेत. फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी शंभर दिवसांच्या कार्यक्रमानुसार, एमएसआयडीसीमार्फत ३४ जिल्ह्यांत जवळजवळ ५ हजार ९७० किमी. लांबीचे रस्ते सुरू करण्याचे प्रस्तावित होते. प्रत्यक्षात उद्दिष्टापेक्षा जास्त कामे सुरू केली असून ती लवकरच पूर्ण होतील.**

# सावित्रीबाई फुले जन्मस्थळ विकासाचा प्रस्ताव

**मुंबई :** जिल्हाधिकाऱ्यांकडून 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्रा'साठी १४२.६० कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव साताऱ्याच्या शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरू असल्याची लेखी माहिती राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी शुक्रवारी विधान परिषदेत दिली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य पंकज भुजबळ यांनी यासंदर्भातील प्रश्न विचारला होता. त्याच्या लेखी उत्तरात ही माहिती देण्यात आली.




# साखरेसह उपपदार्थांचेही दर वाढले

**बाबूराव रानगे**

**कोल्हापूर :** यंदा गळीत हंगाम लवकर संपला असला तरी साखरेसह उपपदार्थांना उच्चांकी दर मिळत आहे. साखरेचे उत्पादन घटल्याने भविष्यात या दरात आणखी वाढ होणार आहे. सध्या साखरेला प्रतिक्विंटल ३९०० ते ४००० रुपये दर मिळत आहे, तर प्रतिटन २२०० रुपयांना विकल्या जाणाऱ्या बगॅसला प्रतिटन ३४०० ते ३६०० रुपये इतका दर मिळत आहे. मळीलाही प्रतिटन १२५०० ते १४००० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे कारखानदारी अडचणीतचा कांगावा न करता एफआरपी अधिक जादा प्रतिटन ५०० ते ७०० रुपयांचा दुसरा हप्ता देण्याची मागणी ऊस उत्पादकांतून होऊ लागली आहे.

प्रत्येक वर्षी गळीत हंगामाच्या तोंडावरच साखरेच्या दरात कमालीची घसरण होते. त्यामुळे साखर कारखानदारांकडून एफआरपीपेक्षा जादा दर देण्याचे सोडाच, पण एकरकमी एफआरपीही देणे शक्य नसल्याचा कांगावा करत असतात. यंदाचा हंगाम अवघ्या ८३ दिवसांत संपला. खरे तर किमान १४० ते १५० दिवस हंगाम चालल्यास जादा गाळप होऊन साखर कारखान्यांना उत्पादन खर्च परवडतो.

**- उत्तरार्ध**



### ऊस शेती संकटात

वेळेत ऊसतोड होत नसल्याने या वर्षी स्वतः शेतकऱ्यांना हातात कोयता घ्यावा लागला. त्यामुळे यंदा सुमारे ५८ टक्के अडसाली लावणी कमी झाल्या आहेत. यापुढे ज्याच्या अंगात कारखान्याला ऊस घालवायची ताकद आहे त्यानेच ऊस लावावा, अशी स्थिती झाल्यामुळे पुढील हंगाम यापेक्षा बिकट असण्याची शक्यता आहे.

**प्रा. एम. टी. शेलार, साखर कारखानदारीचे अभ्यासक**

### साखरेचा आणि उसाचा दर

| साल | साखरेचा दर (प्रतिक्विंटल) | मिळालेला दर (प्रतिटन) |
|---|---|---|
| २०११-१२ | २५३० | २४१५ |
| २०१२-१३ | २८५३ | २६५० |
| २०१३-१४ | २६८४ | २५५० |
| २०१४-१५ | २६६८ | २५०० |
| २०१५-१६ | २३२१ | २५३३ |
| २०१६-१७ | ३२९० | ३११५ |
| २०१७-१८ | ३४२२ | ३०२५ |
| २०१८-१९ | २७१५ | २८७७ |
| २०१९-२० | २८४० | २८१० |
| २०२०-२१ | २९९४ | २८४० |
| २०२१-२२ | ३०८८ | २९२० |
| २०२२-२३ | ३२८३ | २९५० |
| २०२३-२४ | ३६०० | ३१५० |
| २०२४-२५ | ३८५० | ३४०० |

### यंदा एफआरपी अधिक ५०० रुपये जादा द्या

महाराष्ट्रातील साखर कारखानदारीला ७० वर्षांहून अधिक काळ लोटला तरी दरवर्षी साखर कारखाने अडचणीत, असा कांगावा करत उसाला कमी दर देण्याचे काम कारखानदार करत आहेत; परंतु नोकर भरती, वारेमाप खर्चातील मनमानीने, भ्रष्ट कारभाराने अनेक कारखाने अडचणीत आले आहेत. अनेक कारखान्यांतील प्रस्थापित मात्र ऐशोरामात जगत आहेत. साखर कारखानदारीतील मुख्य घटक असणारा शेतकरी मात्र कंगाल होत आहे. कारखान्याच्या जीवावर राजकीय दुकानदारी सुरू आहे. अनेक कारखानदारांनी केलेली कोटीच्या कोटीची उड्डाणे सर्वश्रुत आहेत.

**धनाजी चुडमुंगे, आंदोलन अंकुश संघटना**

# अपात्र झोपडीधारकांनाही धारावी प्रकल्पातच घर

**मुंबई :** अपात्र झोपडीधारकांनाही मुंबईतच घर देणारा धारावी पुनर्विकास प्रकल्प हा एकमेव प्रकल्प असून धारावीतील एक इंचही जागा अदाणीला देण्यात आलेली नाही, असा स्पष्ट निर्वाळा मुंबई उपनगराचे सहपालकमंत्री आशिष शेलार यांनी शुक्रवारी विधानसभेत दिला.

विधानसभेत मांडण्यात आलेल्या नियम २९३ अन्वये चर्चेला सरकारतर्फे शेलार यांनी उत्तर दिले. सदस्यांकडून धारावीबाबत उपस्थित करण्यात आलेल्या विविध शंका आणि प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

धारावीतील एकूण ४३० एकर जागेपैकी ३७ टक्के जागेत खेळाचे मैदान, मनोरंजन मैदान यासारखी मोकळी जागा राहणार आहे. 'धारावीची जागा अदाणीला दिली' हे अत्यंत खोटे व असत्य आहे. धारावीतील जागा अदाणीला दिली असा कांगावा करणाऱ्यांना धारावीतल्या सगळ्या जागेची मालकी धारावी पुनर्विकास प्राधिकरण (डीआरपी) नावाच्या राज्य सरकारने स्थापन केलेल्या कंपनीची आहे, हे माहीत नाही काय? खोटे बोलणाऱ्यांनी अदाणीच्या नावाने एक सातबारा दाखवावा, असे आव्हानही त्यांनी दिले. डी.आर.पी.पी.एल. ही कंपनी पुनर्विकासाची कंत्राटदार म्हणून काम करणार आहे. त्यामुळे कंत्राटदाराला निविदेनुसार जे फायदे मिळणार आहेत, त्यातीलही २० टक्के हिस्सा राज्य सरकारला मिळणार आहे. धारावीतील जवळ जवळ ५० टक्के जागा ही महापालिकेच्या मालकीची आहे, तर काही राज्य सरकार आणि केंद्र सरकारची आहे. ज्या जागामालकाची जागा झोपडपट्टी पुनर्विकासाला घेतली जाते, त्याला त्या जागेच्या रेडिरेकनरच्या २५ टक्के एवढी किंमत मिळते. त्याच नियमानुसार मुंबई महापालिकेसह सरकारच्या ज्या प्राधिकरणाच्या जागा आहेत, त्यांना पंचवीस टक्के रक्कम मिळणार आहे.



मंत्री आशिष शेलार यांची विधानसभेत ग्वाही

## नोटिस

मी श्रीमती शुभांगी राजेंद्र नलावडे, वय ४३ वर्षे, राहणार ९, ४था माळा, पी एस आय वसाहत, काद्री चाळ, लेडी जमशेदजी रोड, माहीम, मुंबई - ४०००१६. माझे पती कै. श्री. राजेंद्र वसंत नलावडे, हे दिनांक २४/०६/२०२४ रोजी अपघाताने मृत्यू पावले, त्यांच्या मृत्यू पश्चात आम्ही वारस पुढीलप्रमाणे, कै. श्री. राजेंद्र वसंत नलावडे (स्वतः) (मयत), श्रीमती शुभांगी राजेंद्र नलावडे (पत्नी), कुमारी प्राची राजेंद्र नलावडे (मुलगी), कुमार रुद्रांत राजेंद्र नलावडे (मुलगा), माझ्या पतीच्या मृत्यू पश्चात त्यांचा भविष्य निर्वाह निधी व उपदनाची देय रक्कम मिळण्याकरिता मी अर्ज करीत आहे.

जर कोणाला काही हरकत असल्यास पुढील १५ दिवसांत, अतिनिष्क विभाग कुलाबा, ४ था मजला, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे संपर्क करावा.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
Office of The Executive Engineer (Civil), Prakashgad, Plot No. G-9, Bandra (E), Mumbai-51
Phone: (O) 26474211 / 26472131 Fax : 26472866,

## ई–निविदा सुचना

एमएसईडीसीएल (नियोक्ता) च्या वतीने कार्यकारी अभियंता (स्था.), स्थापत्य विभागातील बांद्रा अंतर्गत २०२४–२५ साठी पात्र बोलीदाता / एजन्सीज कडून निविदा क्र. EEC/BND/TECH/T-17/2024-25 ते EEC/BND/TECH/T-18/2024-25, निविदा फक्त इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीमधूनच प्रक्रिया केली जातील आणि एमएसईडीसीएलच्या कामकाजासाठी ई–निविदा प्रणालीवर नोंदणी केलेल्या विक्रेत्यांसाठी खुली असेल. बिड कागदपत्रे २२.०३.२०२५ ते २७.०३.२०२५ वेळ १२.०० पर्यंत वेबसाइटवर उपलब्ध होतील. निविदा सादर करण्याची शेवटची तारीख २७.०३.२०२५ वेळ १६.०० पर्यंत आहे. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट *www.mahadiscom.in*, ई–निविदा दुव्यास *https://etender.mahadiscom.in* ला भेट द्या. एजन्सींना या आणि भविष्यातील ई–निविदा साठी स्वतः ची नोंदणी करण्याची विनंती केली जाते.

**पी.आर.ओ. नं. १०२/२५ दि.२१.०३.२०२५**

## जाहीर समन्स

**मा.सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, जालना यांचे न्यायालयात**
**( श्री. ए. एन. जयस्वाल यांचे समक्ष)**

जाहीर समन्स (रुल 05 नियम 20 प्रमाणे)
विशेष दिवाणी दावा क्रमांक 82/2015 — निशाणी क.
गौरी अॅग्रोटेक वि. मे. लोटस फार्मस — पुढील ता : 02/05/2025

प्रती,
Vaibhav Traders Mumbai, 23 Sai Darshan Opp. Maratha Mandir Co-op, bank, Kajupda, Ghatkopar West, Mumbai

ज्याअर्थी वादीचे वकील **अॅडव्होकेट व्ही. एम. जाधव** यांचेमार्फत वादी गौरी अॅग्रोटेक यांनी वरील प्रतिवादी विरुध्द दिवाणी दावा दाखल केला आहे. म्हणून, हे जाहिर समन्स प्रसिध्द झाल्यापासून दहा दिवसांच्या आत तुमच्यासाठी उपस्थितिपत्र दाखल करविण्यासाठी तुम्हाला याव्दारे बोलावण्यात येत आहे आणि असे करण्यात तुम्ही कसूर केल्यास, उक्त दहा दिवसांचा कालावाधी समाप्त झाल्यानंतर रुपये - /- पेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम व न्यायालय आदेश देईल त्याप्रमाणे, कोणतेही व्याज असल्यास त्यासह दावा खर्चासाठी रु. - /- इतकी रक्कम यांचा हुकूमनामा मिळविण्यास वादी हक्कदार राहील.

जर तुम्ही तुमच्यासाठी उपस्थितिपत्र दाखल करविले तर त्यानंतर वादी तुमच्यावर न्यायनिर्णयासाठी समन्स बजावील. या न्यायनिर्णयाच्या सुनावणीच्या वेळी तुम्हाला दाव्यामध्ये बचाव करण्याच्या परवानगीसाठी न्यायालयाला विनती करण्यास हक्कदार राहील. दाव्याचा बचाव गुणवत्तेनुसार करता येईल किंवा तुम्हाला बचावाची अनुज्ञा देणे वाजवी ठरेल याबाबत, तुम्ही न्यायालयाचे शपथपत्रावर किंवा अन्यथा समाधान करु शकलात तर तुम्हाला बचावाची परवानगी मिळवता येईल.

आज दिनांक 21/03/2025 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

एम.ए. लगडे, क. लिपीक — शिक्का — आदेशान्वये/- स.अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व.स्तर) जालना

## SMITA PATIL PUBLIC SCHOOL

CBSE-AFFILIATED SECONDARY CO EDUCATIONAL RESIDENTIAL SCHOOL
Smitnagar, Dahiwad, Tal.Shirpur, Dist. Dhule, Maharashtra
CBSE AFFILIATION NO.: 1130241, CENTRE NO: 30164

INVITING APPLICATIONS

**Shape the Future of India with Smita Patil Public School**
**Opportunities for Experienced and Fresher, Inspiring Educators!**
Are you passionate about shaping young minds and nurturing the leaders of tomorrow? If education is your calling, join Smita Patil Public School – where innovation meets dedication, and teaching is a mission beyond the classroom.

Open Positions:
- **Pre-Primary Teachers (PRT) & Headmistresses**
- **Trained Graduate Teachers (TGT)** – All Subjects
- **Post Graduate Teachers (PGT)** – All Subjects
- **Skill Development Teachers:** Dance and Drama or Performing Arts,Fine Arts, Music, etc.
- **Academic coordinator :** (At least 2 years Experience)
- **Admin Clerks for Data Entry**
- **Academic & Admin coordinators :** (At least 2 years Experience)
- **Librarian cum Teacher**
- **Wardens / Dorm Parents / Caretakers**

Why Smita Patil Public School?
- Provident Fund
- Free Food and Accommodation
- Free Education for a Child of Teaching Staff
- Holistic Learning Environment and Professional Growth

**Apply within 10 days from the day of publishing this advertisement.**

**ELIGIBILITY :** a) Post Graduate/Graduate, B.Ed. For TGT, Graduate, B.Ed./D.El.Ed for PRT
b) Fluency in English is mandatory c) Competency in MS Office Suite is mandatory
d) Digital competency is a must e) Must have good interpersonal skills

Contact Us: Email: - spps457@gmail.com
Website:-https://smitapatilpublicschool.com/
**Smita Patil Public School**
Phone: 7829264092 / 9607070877

# एसआरएमध्येही स्वयंपुनर्विकास योजना येणार

**मुंबई :** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्येही स्वयंपुनर्विकास योजना आणण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी शुक्रवारी विधान परिषदेत सांगितले.

मुंबई गृहनिर्माण क्षेत्रामधील सदनिकांचे दर जास्त असल्याची बाब लक्षात आल्यानंतर हे दर कमी करून फेरजाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. हे दर रेडिरेकनरच्या ११० टक्के आहेत. नेहरूनगर व टिळकनगर येथील म्हाडा वसाहतीतील ३०१ इमारतींपैकी १८२ इमारतींच्या पुनर्विकासाकरिता म्हाडामार्फत मंजुरी देण्यात आली असून आणखी ४९ इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र जाहीर करण्यात आले आहे.

# प्रोबेशनरी काळ कामाचा अनुभव नाही

## महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त भरतीसंदर्भातील दाखल याचिकांसंदर्भात निर्णय

**मुंबई :** प्रोबेशनरी प्रशिक्षण कालावधी मुख्य कामाचा अनुभव म्हणता येणार नाही, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदवले आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त (गट अ) पदासाठी नियुक्त केलेल्या काही उमेदवारांच्या पात्रतेला आव्हान देणाऱ्या काही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या.

भागवत पानझडे आणि रोहित फड यांनी केलेल्या याचिका योग्य ठरवताना न्या.भारती डांगरे आणि न्या.अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने उपरोक्त निर्णय दिला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) निश्चित केलेल्या ५ वर्षांच्या अनुभवाच्या निकषांची पूर्तता न केल्याचा आरोप केला होता. हा निकष पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांच्या गुणवत्ता यादीतील

### उच्च न्यायालयाचे निरीक्षण

समावेशावर प्रश्न उपस्थित केले होते. भागवत पानझडे यांनी सचिन पानझडे यांच्या गुणवत्ता यादीतील समावेशाला आव्हान देताना त्यांचा दोन वर्षांचा प्रोबेशनरी प्रशिक्षणार्थी कालावधी अनुभव म्हणून मानला जाऊ नये, असा युक्तिवाद केला होता. तर, रोहित फड यांनी विजय त्र्यंबक पालवे यांच्या पात्रतेला आव्हान देताना इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमीमध्ये त्यांचे १६ महिन्यांचे प्रशिक्षण प्रशासकीय अनुभव म्हणून पात्र नाही, असा दावा केला होता.

वास्तविक अनुभवामध्ये प्रत्यक्ष प्रशासकीय किंवा पर्यवेक्षी जबाबदाऱ्यांचा समावेश असतो यावर जोर देऊन न्यायालयाने प्रोबेशनरी प्रशिक्षणार्थी कालावधी वैध अनुभव म्हणून गणला जाऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. तसेच, पानझडे आणि फड यांच्या याचिका योग्य ठरवल्या. त्याचवेळी, एमपीएससीला चार आठवड्यांच्या आत निवड यादी अंतिम करण्याचे आदेश देताना दिले.

## निडो होम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
**नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई–४०० ०७०**

nido HOME FINANCE

### ई–लिलाव – वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई–लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार व हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदार/हमीदाराचे नाव | वसुली रक्कम | राखीव मूल्य व इरठे | लिलाव दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | **गणेश महादेव राजोळी** (कर्जदार) व **शीतल गणेश राजोळी** (सहकर्जदार) | **एलएएन नं. : एलएमयूएमएसटीएल००००३९६३७** करिता दि. २१.०३.२०२५ रोजीनुसार रक्कम **रु. १२,४४,५२७.०१** (रु. बारा लाख चव्वेचाळीस हजार पाचशे सत्तावीस व एक पैसा मात्र) + त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च. | **रु. २१,४२,८००/–** (रु. एकवीस लाख बेचाळीस हजार आठशे मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. २,१४,२८०/–** (रु. दोन लाख चौदा हजार दोनशे ऐंशी मात्र) | **०६.०५.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासमवेत)** |
| **परीक्षण दिनांक व वेळ : दि. ०४.०४.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. ३.०० या वेळेत** | | | **प्रत्यक्ष ताबा दिनांक : २१.०२.२०२५** | |

**प्रतिभूत संपत्तीचे विवरण** : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : फ्लॅट क्र. २११, दुसरा मजला, ''सी'' विंग, ''मातोश्रीनगर'' नावाने ज्ञात इमारतीतील, एनए नं. १ – डी, प्लॉट क्र. २६, सिटी सर्व्हे क्र. ५३९९ ते ५५२६, ५५८६ ते ५५९७, ५६८५ ते ५७२६ धारक एनए (बिगरशेतजमीन) जमिनीवर निर्मित, फ्लॅट क्षेत्र मोजमापित साधारण ४५.२७ चौ. मी., विभाग क्र. २/१, मनपा घर क्र. ४८२४/२११, गाव कोहोज, खुंटवली, वंदना टॉकीजजवळ, विमको नाका, अंबरनाथ (प.), तालुका अंबरनाथ, जि. ठाणे, तालुका व जिल्हा नोंदणीकरण उल्हासनगर, उपजिल्हा नोंदणीकरण ठाणे व अंबरनाथ महानगरपालिका हद्दीतील.

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई–मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई–लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
**लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड, बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी–ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.**
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : **०५.०५.२०२५.**
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई–मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

**मोबाइल क्र. : ९००४३५९८३५/९७६८७४६६२४**
**दिनांक : २२.०३.२०२५**

**सही/– प्राधिकृत अधिकारी**
निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

## मध्य रेल्वे

**ई–निविदा सूचना क्र. : NIT/01/25/14**
**Dated : 20 March 25**

प्रधान मुख्य सामग्री व्यवस्थापक, मध्य रेल्वे हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता व त्यांच्या वतीने खालील बाबींच्या पुरवठ्याकरिता ई–निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | विवरण | परिमाण | नियत तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ५०२५५०३९ | अंडरग्राऊंड जेली फिल्ड ६ क्वाड बाय ०.९ मिमी व्यासाचे कॉपर कंडक्टर केबल | १४६० किमी | ०४.०४.२०२५ |
| २ | ५०२५५०६७ए | ६ कोअर बाय १.५ चौ. मिमी आकाराचे पीव्हीसी इन्सुलेटेड आर्मर्ड अनस्क्रीन्ड कॉपर कंडक्टर अंडरग्राऊंड रेल्वे सिग्नलिंग केबल | ४७९.८ किमी | ०४.०४.२०२५ |
| ३ | २७२५३०००ए | हाय रीच पॅन्टोग्राफ | संख्या ६६ | ०७.०४.२०२५ |
| ४ | २७२५१३०३ | मेन गीयर व्हील ५८ टीथ | संख्या ११८ | ०९.०४.२०२५ |
| ५ | ४२२५१२०९ | डायरेक्ट एअर ऑपरेटेड पॅन्टोग्राफ | संख्या ३३ | १४.०४.२०२५ |
| ६ | २७२५११८७ | कपॅसिटर हार्मोनिक फिल्टर | संख्या १३६ | १५.०४.२०२५ |
| ७ | २७२४३२५८ई | साइड बफर | संख्या १९९ | १७.०४.२०२५ |
| ८ | २७२५३९३९ | मूव्हिंग कॉइल मीटरचा संच | १२६ संच | १७.०४.२०२५ |
| ९ | ६१२५१३४८ए | मिनिकॅप २.५ वा २ लिटरसह सीएपीडी सोल्युशन ७.५% | संख्या ७१०० | १७.०४.२०२५ |
| १० | ६१२५३०७३ए | ग्लिकोपीजीलाई रिकॉम्बीनन्ट एक्सटेंडेड हाफ लाइफ फॅक्टर ८ (युनिट आययू) | संख्या ४२४९५० | १७.०४.२०२५ |
| ११ | २७२५२१७० | गीयर व्हील ६५ टीथ | संख्या २११ | २१.०४.२०२५ |
| १२ | ३८२५०२९४ | जोडलेल्या परिशिष्टानुसार ४८ बाबींचा समावेश असलेले पीओएच किट डी. व्ही. कीओ टाइप | २१०८ संच | २३.०४.२०२५ |
| १३ | २७२५३४६७ | लॅबिरिन्थ व बेअरिंग कॅपचा संच | ९८५ संच | ०२.०५.२०२५ |
| १४ | २७२५३४०१ | ट्रॅक्शन बारकरिता हाऊजिंग | संख्या ४१० | ०६.०५.२०२५ |
| १५ | ३८२५३४३२ | साइड बेअररकरिता वेअरिंग प्लेट | संख्या ९५१ | ०८.०५.२०२५ |
| १६ | २७२५३९५६ | इलास्टिंग रिंग | संख्या ६६१ | १३.०५.२०२५ |
| १७ | २७२५३२५१ | सिलिंड्रिकल रोलर अॅक्सल बॉक्स बेअरिंग युनिट | संख्या १४०२ | १९.०५.२०२५ |
| १८ | ५१२४४९६७ | आरडीएसओ ड्रॉ. क्र. टी–४९६७ नुसार पीएससी स्लीपर्सवर ६० किग्रॅ रेल्सकरिता १ इन ८.५ सीएमएस क्रॉसिंगचा पुरवठा | ४५४ संच | १५.०४.२०२५ |

**टीप** : वरील निर्देशित निविदा या ई–निविदा आहेत व सर्व निविदाकारांनी कृपया त्यांच्या बोली आयआरईपीएस वेबसाइट https://www.ireps.gov.in वर ऑनलाइन सादर कराव्यात. वरील निर्देशित निविदांसंदर्भातील अधिक तपशिलाकरिता तसेच अन्य पुरवठा निविदांकरिता कृपया आयआरईपीएस वेबसाइटला भेट द्यावी.

**DE-858** — **प्रधान मुख्य सामग्री व्यवस्थापकांकरिता**

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

### अमली पदार्थ तस्करी

# तीन भारतीयांना मृत्युदंडाची शक्यता

**सिंगापूर :** इंडोनेशियात अमली पदार्थ तस्करीच्या आरोपात तीन भारतीय नागरिकांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली जाऊ शकते. सिंगापूरच्या राष्ट्रध्वज असलेल्या जहाजातून १०६ किलो 'क्रिस्टल मेथ'ची तस्करी केल्याचा या तिघांवर आरोप आहे. राजू मुथुकुमारन (३८), सेल्वदुरई दिनाकरन (३४) आणि गोविंदसामी विमलकंधन (४५) अशी या तिघांची ओळख पटवण्यात आली आहे. मूळचे तामिळनाडूचे हे तिघे सिंगापूरमधील एका शिपिंग कंपनीत कामाला होते. अमली पदार्थ तस्करी प्रकरणात त्याना जुलै २०२४ मध्ये अटक करण्यात आली होती. याप्रकरणात न्यायालयाकडून १५ एप्रिल रोजी निर्णय दिला जाऊ शकतो. तिघांना मृत्युदंडाची शिक्षा होण्याची शक्यता आहे.

